*Open Access, Peer Reviewed, Research Journal*
©JES Printer and Publisher
Print & Online available on https://jesbulletin.in

**Research Article**

# महाविद्यालयातील खेळाडु विद्यार्थी व महाविद्यालयातील विद्यार्थी यांच्या भावनिक बुध्दीमत्ता याचा एक तुलनात्मक अभ्यास

**प्रा. डॉ. रामकिसन बेलनुर**
सहा. प्राध्यापक, मानसशास्त्र विभाग
मत्स्योदरी कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, अंबड जि. जालना

**Article Info**

**Received**: 11/02/2025
**Revised**: 20/02/2025
**Accepted**:11/03/2025

**Keywords**: **महाविद्यालयातील, खेळाडु, विद्यार्थी, भावनिक बुध्दीमत्ता**

**Abstract**

महाविद्यालयातील खेळाडु विद्यार्थी व महाविद्यालयातील विद्यार्थी यांच्या भावनिक बुध्दीमत्ता याचा एक तुलनात्मक अभ्यास' करण्यात आला. यामध्ये अंबड शहरातील महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा समावेश करण्यात आला आहे.यामध्ये खेळाडु विद्यार्थी 15 महाविद्यालयातील विद्यार्थी 15 अशा प्रकारे एकुण 30 प्रयुक्तांचा विचार करण्यात आला आहे. माहिती संकलनासाठी एस. के. मंगल आणि शुभरा मंगल यांची भावनिक बुध्दीमत्ता चाचणीचा वापर करण्यात आला. संख्याकीय विश्लेषण करताना टी टेस्ट चा वापर करण्यात आला आहे. संशोधनांती असे दिसुन आले आहे की, खेळाडु विद्यार्थी हे महाविद्यालयातील विद्यार्थी पेक्षा जास्त भावनिक बुध्दीमत्ता असलेले दिसुन आले आहे.

## INTRODUCTION:

मानवी जिवनात खेळाचे स्थान महत्वाचे आहे. मानवाच्या उत्क्रांती पासून ते आज पर्यंत अनेक स्वरूपाचे खेळात बदल झाले आहे. यामध्ये सुरूवातील मनोरंजनासाठी सुरू झालेला खेळ व्यावसाईक झाला असे दिसुन येते. तसेच इतर प्रण्यांच्या तुलनेत मानव हा भावनाप्रधान प्राणी आहे. तसाच ते बुध्दीमान देखील आहे. अशा अनेक अंगाने विचार केला असता मानवी जिवनात भावना व्यवस्थापन खुप महत्वाचे दिसुन येते. आज कालाच्या मोबाईलच्या युगात खेळाचे हरवत चाललेले महत्व तसेच बोथट झालेल्या मानवी भावना याचा विचार करतानाच आजची तरूणाई दिसुन येते.

प्रस्तुत संशोधनातमहाविद्यालयातील खेळाडु विद्यार्थी व महाविद्यालयातील विद्यार्थी यांच्या भावनिक बुध्दीमत्ता याचा विचार करण्यात आला आहे. 'बुध्दीमत्ता म्हणजे अमुर्त पातळीवर विचार करण्याची क्षमता होय.' ही मानवाला लाभलेले वरदानच आहे. या बंध्दीमत्तेमध्ये अनेक प्रकारांचा शोध मानशास्त्राज्ञांनी लावले आहेत. यामध्ये सर्वात प्रभावी बुध्दीमत्ता म्हणुन भाववीक बुध्दीमत्ता कडे पाहीले जाते. 'भावना ओळखता येणे, त्यांचे व्यवस्थापन करणे, त्याभावनांचा आदर करणे, याव अशा स्वरूपाची बुध्दीमत्ता म्हणजेच भावनीक बुध्दीमत्ता होय'. थोडक्यात भावना समजावुन घेणारी अंतरीक क्षमता होय. या मुळे मानुस आधिक मानवतावादी होण्यास मदत होते. या भावनिंक बुध्दीमत्तेचे पाच घटक आहेत. यामध्ये स्वत:ची जाणिव, स्वनियंत्रण, सामाजिक कौशल्य, सहानुभुती, प्रेरणा यांचा समावेश होतो.

**पुर्व संशोधन आढावा**:-प्रमिला सुर्वे(2023) यांनी एन.सी.सी व एन. एस. एस. विद्यार्थ्यामधील भावनीक बुध्दीमत्ताचा अभ्यास केला आहे. यामध्ये त्यांनी इचलगरंजी येथील 30 विद्यार्थ्यांचा समावेश केला. तेव्हा त्यांना एन.सी.सी व एन. एस. एस. विद्यार्थी व विद्यार्थीनी

यांच्यात भावनीक बुध्दीमत्ता संदर्भात लक्षणीय फरक दिसुन आला आहे.

**संशोधनाचे महत्व:-** सदरील संशोधनामुळे खेळा संदर्भात असलेले महत्व आधोरेखीत होईल तसेच भावनीक बुध्दीमत्ता याचे महत्व वाढण्यास मदत होईल.

**संशोधनाची उद्देश:-** महाविद्यालयातील खेळाडु विद्यार्थी व महाविद्यालयातील विद्यार्थी यांच्या भावनिक बुध्दीमत्ताचा एक तुलनात्मक अभ्यास करणे.

**संशोधनाची गृहितके:- 1)** महाविद्यालयातील खेळाडु विद्यार्थी व महाविद्यालयातील विद्यार्थी यांच्या भावनिक बुध्दीमत्ता याचा मध्ये लक्षणीय फरक असतो.

2) 'महाविद्यालयातील खेळाडु विद्यार्थी व महाविद्यालयातील विद्यार्थी यांच्या भावनिक बुध्दीमत्ता याचा मध्ये लक्षणीय फरक नसतो.

**संशोधन आराखडा:-** प्रस्तुत संशोधनासाठी प्रायोगीक संशोधन पध्दतीचा वापर करण्यात आला आहे. यामध्ये स्वतंत्र परिवर्तक महाविद्यालयातील खेळाडु विद्यार्थी व महाविद्यालयातील विद्यार्थी हे आहेत. परतंत्र परिवर्तकामध्ये भावनिक बुध्दीमत्ता याचा समावेश होते. नमुना घेताना अंबड शहरातील महाविद्यालयातील खेळाडु विद्यार्थी (15) व महाविद्यालयातील विद्यार्थी (15) यांचा समावेश करण्यात आला आहे. ज्यांचे वय 18 ते 20 आहे.या संशोधनासाठी एस. के. मंगल आणि शुभरा मंगल यांची भावनिक बुध्दीमत्ता चाचणीचा वापर करण्यात आला. संख्याकीय आकडेवारी विश्लेषणात टी टेस्ट वापरण्यात आली आहे.

**संशोधनाचे विश्लेषण:-**तक्ता- महाविद्यालयातील खेळाडु विद्यार्थी व महाविद्यालयातील विद्यार्थी यांच्या भावनिक बुध्दीमत्ताचा तुलनात्मक 'टी'

| | नमुना Sample | मध्यमान Mean | प्रमाण विचलन SD | Df | 'T' Value | Significant level |
|---|---|---|---|---|---|---|
| खेळाडू | 15 | 72.93 | 10.59 | 28 | 2.07 | 0.5 |
| विद्यार्थी | 15 | 65.73 | 8.38 | | | |

वरील तक्ता वरून असे दिसुन येते की, महाविद्यालयातील खेळाडु विद्यार्थी व महाविद्यालयातील विद्यार्थी यांच्या भावनिक बुध्दीमत्ताचा मध्ये लक्षणीय फरक दिसुन येतो.तसेच महाविद्यालयातील खेळाडु विद्यार्थी यांची महाविद्यालयातील विद्यार्थी यांच्या पेक्षा भावनिक बुध्दीमत्ता अधीक आहे. सदरील संशोधन गृहितक क्रमांक एक सिध्द झाले आहे.

**निष्कर्ष:-**

प्रस्तुत संशोधनांती अस दिसुन येते की, महाविद्यालयातील खेळाडु विद्यार्थी यांची महाविद्यालयातील विद्यार्थी यांच्या पेक्षा भावनिक बुध्दीमत्ता अधीक आहे.

**शिफारशी:-**महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना खेळासंदर्भात जागरूक करणे ज्यामुळे सर्व विद्यार्थी खेळात सहभाग घेतील. भावनीक बुध्दीमत्ता संदर्भात जनमानसात चेतना तयार करणे.

**संदर्भ सुची:-**


1. प्रमिला सुर्वे, (2023), एन.सी.सी व एन. एस. एस. विद्यार्थ्यामधील भावनीक बुध्दीमत्ताचा अभ्यास,http://www.arpkmi.ac.in/wp-content/uploads/2024/09/15.pdf
2. गोलमन (1998) भावनिक बुध्दीमत्ता, बफन्टाम, नुयॉर्क
3. डॉ. रविद्र खंदारे, (2000), खेळाचे मानसशास्त्र, चिन्मय प्रकाशन, छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद)
4. WWW. GOOGLE.COM



Cite this article:

**रामकिसन बेलनुर** 2025 "महाविद्यालयातील खेळाडु विद्यार्थी व महाविद्यालयातील विद्यार्थी यांच्या भावनिक बुध्दीमत्ता याचा एक तुलनात्मक अभ्यास". *JES Bulletin*, 3(2):367-368.